# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## स्मरण परिपत्रक
**संदर्भ - जा.क्र. संलग्नता/टे.५/११४, दि.०६/०९/२०१६**

कै. बॅ. पी.जी. पाटील व कै. प्राचार्या श्रीमती सुमतीबाई पांडुरंग पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून सन १९५२ पासून शिक्षण क्षेत्रात बहुमूल्य योगदान दिलेले आहे. या दोघांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव करण्यासाठी व त्यांचा आदर्श समोर ठेवून त्यागी व तळमळीचे शिक्षक/शिक्षिका निर्माण व्हाव्यात हा हेतू मनात ठेवून कर्मवीर इन्स्टिटयूट ऑफ इंग्लिश, सातारा ही संस्था शिवाजी विद्यापीठाअंतर्गत संलग्न महाविद्यालयातील/मान्यताप्राप्त संस्थेतील आदर्श शिक्षक/शिक्षिकेस अनुक्रमे "कै. बॅ. पी.जी. पाटील व कै.प्राचार्या श्रीमती सुमतीबाई पांडुरंग पाटील पुरस्कार" शिवाजी विद्यापीठामार्फत प्रत्येकवर्षी विद्यापीठाच्या वर्धापनदिनी प्रदान करते. पुरस्काराचे स्वरुप प्रत्येकी रु. ५००१/- प्रदान करणे असे आहे.

पुरस्कारासाठी निवड करताना सोबत जोडलेल्या विहित नमुन्यातील शिक्षक/ शिक्षिकेची माहिती विचारात घेतली जाणार आहे. तसेच या पुरस्कारासाठी शिफारस करीत असताना खालील बाबी विचारात घेण्यात येतील.

१. पुरस्कारासाठी पात्र शिक्षक हा शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील विद्यापीठ मान्यता प्राप्त शिक्षक असावा. तो किमान पीएच.डी. अर्हताधारक असावा. तसेच पुरस्कारासाठी पात्र होण्यासाठी संलग्न महाविद्यालयातील अद्यापनाचा किमान १० वर्षाचा अनुभव असावा.

२. शिक्षकाने आपली गुणवत्ता वाढविण्यासाठी स्वत:च्या विषयासंबंधीचे लेख, संशोधनपर लेख, ग्रंथ लेखन या विषयासंबंधिची व्याख्याने, चर्चासत्रे/ अधिवेशनात सहभाग अथवा लेख सादरीकरण इत्यादी केलेले असावे.

३. सदर शिक्षक आपले अध्यापनाचे व मूल्यमापनाचे काम नियमितपणे करत असले पाहिजेत.

४. आपला विषय व विषयातील इतर सहकारी शिक्षकांच्या संबंधित उपक्रमात सहभाग, क्रमिक पुस्तकांचे लेखन, विषय शिक्षकांच्या संघटनेची शैक्षणिक कारणासाठी बांधणी करणारा असावा.

५. आपल्या विषयातील अद्ययावत व नवीन प्रवाहांची, महत्वाच्या नवीन ग्रंथासंबंधीची माहिती त्यांना असावी. त्या अनुषंगाने विषयाचे ज्ञान अद्ययावत करण्याचा त्यांनी प्रयत्न केला असला पाहिजे.

६. महाविद्यालयाच्या परिसरातील व समाजातील लोकांच्या समस्यांची माहिती त्यांना असावी व त्या सोडविण्यासाठी यथाशक्ती सहभाग असावा.

७. विद्यार्थ्यांना शिकवित असताना त्यांच्या सर्वागींण विकासाकडेही लक्ष असावे. विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबर महाविद्यालयात राबवत असलेल्या इतर उपक्रमात भाग घेण्यास प्रोत्साहन दिले असले पाहिजे.

८. प्रस्तावासोबत Self Appraisal ची प्रत प्राचार्यांनी पाठवावी. तसेच प्रस्ताव पाठवितांना Self Appraisal चे एकूण गुणांकण कळवावे.

९. पुरस्कारासाठी आवश्यक असलेल्या निकष व त्याकरीताच्या गुणांकणापैकी किमान ५०% गुण प्राप्त असलेल्या शिक्षकांना सदर पुरस्कारासाठी पात्र समजण्यात येईल.

१०. पुरस्कार मिळणाऱ्या व्यक्तिचे समाजातील स्थान, इ. बाबी विचारात घेवून पुरस्कार देण्याचा हक्क समितीकडे राखून ठेवला आहे.

११. प्राचार्यांनी प्रस्ताव पाठवितेवेळी वर्तनाबाबतचा स्पष्ट अभिप्राय द्यावा.

१२. प्रस्ताव पाठविते वेळी संबंधित शिक्षकाने सर्व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती पाठवाव्यात. तसेच कागदपत्रे व्यवस्थित निशाण दर्शवावे (flagging) व तक्त्यातील क्रमांकानुसार विभाग व उपविभाग दिसतील असे निशाण दर्शवावे (flagging) वर उल्लेख करावा.

१३. जे निकष दिलेले आहेत त्या निकषांना अनुसरूनच माहिती पाठवावी. अधिकची माहिती पाठवून नये.

उपरोक्त १ ते १३ मुद्दे विचारात घेऊन सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यात गुणांकन करुन जास्तीत जास्त गुण असणा-या एक शिक्षक व एका शिक्षिकेचे नाव प्राचार्यांच्या योग्य त्या शिफारशीसह संबंधित शिक्षकांचा सविस्तर बायोडेटासह माहिती उपकुलसचिव, संलग्नता विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचेकडे **दि.१७/१०/२०१६** पूर्वी पाठवून सहकार्य करावे. या सर्व प्रक्रियेत निवड समितीचा निर्णय अंतिम राहील. महाविद्यालयातील प्राचार्यांनी व यापूर्वी सदरचा पुरस्कार ज्यांना मिळाला आहे अशा शिक्षकांनी पुरस्कारासाठी अर्ज करु नयेत.

**सोबत वरीलप्रमाणे**

**संचालक**
**महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ**

जा.क्र. संलग्नता/टे.५/१३८
दि. ०३/१०/२०१६
**प्रति,**

**मा.प्राचार्य/संचालक सर्व संलग्न महाविद्यालये, सदरचे परिपत्रक सर्व शिक्षकांच्या निदर्शनास आणण्यासाठी अग्रेषित.**

D:\1 August 2010 SSV\P G Patil Award\2015-16\P G Patil Award 2015-16.doc